# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:23.10.2025** **वार:गुरुवार**

---

1. दीपावलीच्या प्रकाश पर्वातील बलिप्रतिपदा, पाडवा सण देशभरात मोठ्या उत्साहात साजरा; भाऊबीजेच्या निमित्ताने आज सर्वत्र लगबग
2. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह भारतीय नौदलाच्या द्वैवार्षिक परिषदेला संबोधित करणार
3. बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या मतदानासाठी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस आणि
4. महिलांच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताची न्यूझीलंडविरुद्ध लढत तर पुरुष संघाचा ऑस्ट्रेलियाविरुद्ध दुसरा मर्यादित षटकांचा सामना

**दिवाळी**

दीपावलीच्या प्रकाश पर्वातला बलिप्रतिपदेचा आणि पाडव्याचा सण काल सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात आला. साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानल्या जाणाऱ्या या सणाच्या दिवशी नवीन खरेदी करण्यासाठी बाजारात मोठी गर्दी दिसून आली. गुजराती नागरिकांचं नव वर्षही कालपासून सुरू झालं. पती-पत्नीच्या नात्याचा सण मानल्या जाणाऱ्या पाडव्यानिमित्त घरोघरी सजावट, फराळ आणि खरेदीची लगबग दिसून आली. अनेक ठिकाणी पाडवा पहाट कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

उत्तराखंडमधल्या उत्तरकाशी जिल्ह्यातल्या गंगोत्री धामची कवाडं काल अन्नकुट सोहळ्यानंतर संपूर्ण हिवाळ्यासाठी बंद करण्यात आली. यानिमित्तानं मंदिरावर रोषणाई तसंच मंदिरात फुलांची आरास करण्यात आली होती. यावेळी गंगा मातेची पालखीतून मिरवणूक काढण्यात आली. या हंगामात गंगोत्री आणि यमुनोत्री धामला 14 लाख भाविकांनी भेट दिली. आज भाऊबीजेच्या दिवशी यमुनोत्री आणि केदारनाथ धामची कवाडं बंद केली जातील. दरम्यान आज सर्वत्र भावा-बहिणींमधील शाश्वत प्रेमाचे, संरक्षणाचे आणि आशीर्वादाचे प्रतीक असलेला भाऊबीजेचा सण साजरा केला जात आहे.

**राष्ट्रपती-केरळ**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू केरळच्या चार दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. आज मुर्मू यांच्याहस्ते राजभवन येथे माजी राष्ट्रपती के. आर. नारायणन यांच्या अर्धपुतळ्याचे अनावरण करण्यात येणार आहे. त्यानंतर राष्ट्रपती तिरुवनंतपुरमजवळील वर्कला येथील शिवगिरी मठात श्री नारायण गुरु समाधीच्या शताब्दी समारंभात सहभागी होणार आहेत. काल, राष्ट्रपतींनी सबरीमाला मंदिराला भेट दिली.

**कमांडर्स कॉन्फरन्स**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आज नवी दिल्ली येथे भारतीय नौदलाच्या द्वैवार्षिक कमांडर्स कॉन्फरन्स 2025 मध्ये संबोधित करणार आहेत. ऑपरेशन सिंदूर आणि नौदलाच्या लढाऊ तयारीच्या पार्श्वभूमीवर कालपासून सुरू झालेली ही तीन दिवसांची परिषद महत्त्वाची मानली जात आहे. ही परिषद राष्ट्रीय नेतृत्व आणि नोकरशहांसोबत जवळून संवाद साधण्यासाठी आणि सध्याच्या भू-सामरिक वातावरणात आव्हाने कमी करण्यासाठी नौदलाच्या दृष्टिकोनाला व्यापक आयाम देण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून ही परिषद काम करत आहे. नौदल प्रमुख, इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांसाह हिंद महासागर क्षेत्रातील एकंदर सुरक्षा परिस्थितीशी संबंधित योजनांचा आढावा आणि मूल्यांकन करतील.

**बिहार**

बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी निवडणूक प्रचाराला वेग आला आहे. 6 नोव्हेंबर रोजी 18 जिल्ह्यांमधील 121 विधानसभा मतदारसंघांमध्ये मतदान होणार आहे. मुख्यमंत्री नितीश कुमार आणि वरिष्ठ भाजप नेते राष्ट्रीय

लोकशाही आघाडीच्या उमेदवारांच्या समर्थनार्थ प्रचार करत आहेत. रालोआ सरकार सत्तेत आलं तर बिहारला विकसित राज्य बनवण्याचं स्वप्न पूर्ण होईल, असं आश्वासन बिहारचे मुख्यमंत्री नीतिशकुमार यांनी काल एका प्रचारसभेत दिलं. उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी, केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांनीही विविध ठिकाणी सभा घेतल्या. महाआघाडी सत्तेत आली तर स्वयंसहायता गटांशी संबंधित जीविका दीदी आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सरकारी नोकरी देण्याचं आश्वासन राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी प्रसाद यादव यांनी दिलं आहे.

दरम्यान, राष्ट्रीय जनता दल आणि काँग्रेस यांच्या नेतृत्वाखालील महाआघाडी आज त्यांची संयुक्त रणनीती आणि प्रचार कार्यक्रम जाहीर करण्याची शक्यता आहे. तर दुसऱ्या टप्प्यातल्या मतदानासाठी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस आहे. या टप्प्यात 11 नोव्हेंबर रोजी 20 जिल्ह्यांमधील 122 विधानसभा मतदारसंघांमध्ये मतदान होणार आहे. कैमुर जिल्ह्यातल्या मोहनिया मतदारसंघातून राष्ट्रीय जनता दलाच्या उमेदवार श्वेता सुमन यांचा उमेदवारी अर्ज रद्द करण्यात आला आहे. सुमन यांचं जात प्रमाणपत्र अवैध ठरवल्यानंतर त्यांचा अर्ज रद्द केला. भारतीय जनता पक्षाने या संदर्भात तक्रार दाखल केली होती.

**<u>एआय</u>**

सरकारने माहिती तंत्रज्ञान नियमांमध्ये बदल प्रस्तावित करण्याच्या दृष्टीने कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे सामग्री निर्माण केली असल्यास त्यावर तसे स्पष्टपणे नमूद करणे अनिवार्य केले आहे. डीपफेक आणि चुकीच्या माहितीमुळे वापरकर्त्यांचे होणारे नुकसान रोखण्यासाठी माहितीची पडताळणी करण्यासाठी फेसबुक आणि यूट्यूब सारख्या मोठ्या प्लॅटफॉर्मची जबाबदारी वाढवण्याची मागणी केली आहे. समाज माध्यमांवर निर्माण प्रसारित होत असलेल्या सामग्रीचा वापर चुकीची माहिती पसरवण्यासाठी, प्रतिष्ठेला हानी पोहोचवण्यासाठी, निवडणुकांमध्ये फेरफार करण्यासाठी किंवा प्रभाव पाडण्यासाठी तसंच आर्थिक फसवणूक करण्यासाठी शस्त्र म्हणून केला जाऊ शकतो असं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<u>खाद्य नोंदणी</u>**

केंद्र सरकारनं सर्व खाद्यतेल उत्पादक, प्रक्रिया करणारे, मिश्रण करणारे, पुन्हा पॅकिंग करणारे आणि या संपूर्ण पुरवठा साखळीत सहभागी असलेल्या प्रत्येक संबंधिताला नोंदणी करणं बंधनकारक करण्यात आलं आहे. यासोबतच या सर्व भागधारकांना उपलब्ध करून दिलेल्या पोर्टलवर दर महिन्याला, त्यांच्याकडील उत्पादनांची आणि साठ्याची माहिती देणं अनिवार्य करण्यात आलं आहे. यामुळे खाद्यतेल क्षेत्राशी संबंधीत अचूक आकडेवारी संकलित करणं, साठ्यावर देखरेख ठेवणं आणि याआधारे धोरणांची आखणी करताना मदत होणार असल्याचं विभागानं म्हटलं आहे.

**<u>जाजू-अमरावती</u>**

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी काल नागपूरच्या आकाशवाणी केंद्राला भेट देवून आकाशवाणी, दूरदर्शनच्या तसंच पत्र सूचना कार्यालय आणि केंद्रीय संचार ब्युरोच्या कार्यालयांच्या कामकाजाचा आढावा घेतला. महाराष्ट्रातील अमरावती इथल्या बडनेरामधील जनसंचार आणि पत्रकारिता क्षेत्रात गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारे भारतीय जनसंचार संस्थानच्या प्रस्तावित इमारतीचं काम 2027 पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश जाजू यांनी दिले आहेत. मनपा आयुक्तांच्या निवास स्थानी उच्चस्तरीय आढावा बैठकीत ते काल बोलत होते.

**<u>निर्बंध</u>**

युक्रेनमध्ये शांतता करारासाठी मॉस्कोवर दबाव आणण्यासाठी अमेरिकेने रशियाच्या रोझनेफ्ट आणि लुकोइल या दोन सर्वात मोठ्या तेल कंपन्यांवर नवीन निर्बंधांची घोषणा केली आहे. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी युद्ध संपविण्यास नकार दिल्यामुळे नवीन निर्बंधांची आवश्यकता असल्याचे अमेरिकेचे कोषागार सचिव स्कॉट बेसेंट यांनी सांगितले. या तेल कंपन्यामुळे युद्धासाठी निधी मिळत असल्याचं अमेरिककडून सांगण्यात आलं आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यातील बुडापेस्टमध्ये होणारी बैठक रद्द केल्यानंतर या निर्बंधांची घोषणा करण्यात आली आहे. दरम्यान युक्रेनमध्ये मोठ्या प्रमाणात रशियन ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यात किमान सहा जणांचा मृत्यू झाला आहे. तर

रशियाच्या ब्रायन्स्क प्रदेशातील एका रासायनिक प्लांटवर मोठ्या प्रमाणात क्षेपणास्त्र आणि हवाई हल्ला यशस्वीरित्या केला असल्याचा दावा युक्रेनकडून करण्यात आला आहे.

**<u>लूव्र</u>**

फ्रान्समध्ये, लूव्र संग्रहालयाच्या संचालक लॉरेन्स डेस कार्स यांनी संग्रहालयाच्या बाह्य देखरेख प्रणालीतील अपयश मान्य केले आहे आणि नवीन सुरक्षा उपाययोजना जाहीर केली आहे. फ्रेंच सिनेटसमोर उपस्थित राहून डेस कार्स म्हणाल्या की संग्रहालयाचे बाह्य सीसीटीव्ही कव्हरेज अपुरे आहे आणि गेल्या आठवड्याच्या अखेरीस झालेल्या दागिन्यांच्या चोरीने अनेक कमकुवत मुद्दे उघड झाले आहेत. या पार्श्वभूमीवर त्यांनी राजीनामा देऊ केला होता परंतु सांस्कृतिक मंत्री रचिदा दाती यांनी त्यास नकार दिला. दरम्यान 102 दशलक्ष डॉलर्सच्या दागिन्यांच्या चोरीनंतर तीन दिवसांनी काल संग्रहालय पर्यटकांसाठी पुन्हा उघडण्यात आलं आहे.

**<u>कबड्डी</u>**

कबड्डीमध्ये, भारताने काल इसा स्पोर्ट्स सिटी हॉल येथे झालेल्या तिसऱ्या आशियाई युवा क्रीडा स्पर्धेत मुलांच्या सामन्यात यजमान बहरीनचा 84-40 असा पराभव केला. इशांत राठीच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने सलग पाचवा सामना जिंकून विजयी घोडदौड सुरू ठेवली. यासह, भारताने गुणतालिकेत आघाडी घेतली आहे आणि अंतिम सामन्यात स्थान निश्चित केले आहे.

**<u>एनकांउटर</u>**

बिहारमधील कुख्यात गुंड रंजन पाठक आणि त्याचे तीन साथीदार विमलेश महातो, मनीष पाठक आणि अमन ठाकूर यांचा दिल्ली आणि बिहार पोलिसांनी केलेल्या संयुक्त कारवाईत मृत्यू झाला आहे. दिल्लीमधल्या रोहिणी भागात ही कारवाई करण्यात आली.

**<u>क्रिकेट</u>**

महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या साखळी फेरीत आज भारत आणि न्यूझीलंड यांच्यात सामना होणार आहे. नवी मुंबईच्या डॉ. डी. वाय. पाटील मैदानावर दुपारी 3 वाजता हा सामना सुरु होईल. गुणतालिकेत दोन्ही संघांनी प्रत्येकी 5 सामन्यांमधून 4 गुणांची कमाई केली आहे. त्यामुळे स्पर्धेच्या उपांत्यफेरीत प्रवेश करण्याच्यादृष्टीनं हा सामना दोन्ही संघासाठी महत्वाचा असणार आहे. दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडच्या संघानं यापूर्वीच उपांत्य फेरीतलं स्थान पक्कं केलं आहे. पुरुष क्रिकेटमध्ये, भारत आज ॲडलेड येथे तीन सामन्यांच्या मालिकेतील दुसरा मर्यादित षटकांचा सामना यजमान ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार सकाळी 9 वाजता सुरू होणार आहे.

**<u>हवामान</u>**

भारतीय हवामानशास्त्र विभागाने आज आंध्रप्रदेश आणि कर्नाटकमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. दरम्यान, दिल्ली-एनसीआरमधील हवेची गुणवत्ता अत्यंत खराब श्रेणीत राहिली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.